# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 08 / 11 / 2022 (बुधवार) सकाळ

---

## जबरी चोरी

**पो.स्टे. कन्हान** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील चक्रधर पेट्रोलपंप रायनगर, कन्हान ता. पारशिवनी येथे दिनांक ०७/११/२०२२ चे ००.४५ वा. ते ०१.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी नामे— अनिल गजानन मस्के, वय ४१ वर्ष, रा. राजेगाव, ता. लाखणी, जि. भंडारा ह. मु. सी/ओ मनोहर राऊत यांचे घरी किरायाने संताजी नगर धर्मराज शाळेच्या मागे कन्हान हे कन्हान येथे चक्रधर पेट्रोलपंप येथे सुपरवायझरचे नौकरीवर असुन त्याच्या सोबत नेहमी प्रमाणे नाईट डयुटीवर असणारे नामे—क्र १) सावन वाघधरे, वय २२ वर्ष २) विशाल वानखेडे, वय २९ वर्ष ३) संकेत शेंडे, वय २० वर्ष असे डयुटी करत असतात नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील आरोपी नामे— १) रोहित यादव, वय २२ वर्ष, रा. कन्हान, तह पारशिवनी २) रोहित यादव, याचा अनोळखी साथीदार वय अंदाजे २३ वर्ष हा युनीकॉर्न काळया रंगाच्या मोटरसायकलने पेट्रोलपंप वर आले त्यावेळेस संकेत शेंडे हा डयुटीवर होता. रोहित यादव याने ''२०० रुपयाचा पेट्रोल भरा'' असे सांगितले असता पेट्रोल भरल्यानंतर रोहीत यादव याने संकेत शेंडे ला ''चिल्लर आहे का'' असे विचारले तेव्हा संकेत शेंडे याने पेट्रोल विक्रीचे पैसे खिशातुन बाहेर काढले असता ते आरोपी रोहित यादव याने साक्षीदार संकेत शेंडे च्या हातातुन २६००/— रुपये जबरीने हिसकावुन घेतले. व दुसरा साक्षीदार सावंत वाघमारे याला सुध्दा विचारले की, ''तुह्या जवळ किती चिल्लर आहे'' असे म्हणुन आरोपीने त्याच्या जवळील देशी कटटा साक्षीदार नंबर २) सावंत वाघधरे यास दाखवुन त्याच्याकडुन ४,६२०/—रु. जबरीने हिसकावुन घेतले तसेच रोहित यादव च्या साथीदाने चाकु फिर्यादीस दाखवुन त्याच्या कडुन १०००/—रु असे एकुण ८२२०/—रु. जबरीने शस्त्राचा धाक दाखवुन हिसकावुन घेतले. आरोपी हे मोटार सायकल वर बसुन पळुन गेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९२, ३४ भादवी .३, ४, २५ शस्त्र अधिनियम भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलिस स्टेशन कन्हान करीत आहे.

## घरफोडी

**पो.स्टे. मौदा** :— अंतर्गत ०१ कि. मी. अंतरावरील वंजारी लेआउट मौदा येथे फिर्यादी नामे— तेजेश्वर कृष्णराव रायकोहाड, वय २८ वर्ष. ,रा. बाबरे पेट्रोलंपंप, वंजारी ले आउट मौदा, जि. नागपुर यांचे रेडीमेट कपडयाचे दुकान असुन त्यांचे राहते घरातील एका हॉलमध्ये चालवतात. दिनांक ०६/११/२०२२ रोजी ०८.०० वा. दरम्यान फिर्यादी याने आपले दुकानाचे शर्टर बंद केले. दिनांक ०७/११/२०२२ रोजी सकाळी ०४.०० वा. फिर्यादी यांची आई ही साफसफाई करीता उठली असता त्यांना दुकानाचे शर्टर अर्धे उघडे दिसले तेव्हा त्यांनी फिर्यादीला जावुन सांगितले असता त्यांनी दुकानातील काऊंटरवर जावुन पाहीले असता त्याचे काऊंटरमध्ये ठेवलेले १६,०००/— रू. कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. मौदा येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४५७, ३८० भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपींचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस स्टेशन मौदा करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**